# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ / (३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./११५/२०२६ दिनांक : १०/०७/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- सत्र २०२६-२७ करीता आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजनार्थ प्रस्ताव पाठविण्याबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दरवर्षीप्रमाणे सत्र २०२६-२७ या शैक्षणिक सत्रातील आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांची सुरूवात माहे ऑगष्ट २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यापासून करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयांकडे क्रीडा स्पर्धा आयोजनाकरीता उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांच्या आधारे आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाकरीता प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

करीता महाविद्यालयांनी उपलब्ध असलेल्या क्रीडा विषयक सोयी सुविधांच्या आधारे आपले प्रस्ताव संलग्नीत प्रपत्रामध्ये **दि. २०/०७/२०२६** पुर्वी या कार्यालयास सादर करावे.

डॉ. अनिता लोखंडे
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव -

1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रपत्र**

प्रति,

मा. संचालक
क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- सत्र २०२६-२७ करीता आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजनार्थ प्रस्ताव सादर..**

संदर्भ :- आपले कार्यालयाचे पत्र क्र. गों.वि.ग./क्री.शा.शि./ ११५/२०२६, दिनांक १०/०७/२०२६

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाकडे खालीलप्रमाणे क्रीडा विषयक सोयी सुविधा उपलब्ध असुन सत्र २०२६-२७ करीता खालील खेळाचे आंतर महाविद्यालयीन स्पर्धा / सामने आमच्या महाविद्यालयामध्ये आयोजीत करण्याची तयारी आहे. करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | भरुन द्यावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | आयोजीत करावयाच्या खेळाचा प्रकार (एका खेळाकरीता एक प्रस्ताव. याप्रमाणे खेळनिहाय प्रस्ताव सादर करणे) | ------------------------------------------------ |
| २ | गट (महिला / पुरूष) | महिला / पुरुष |
| ३ | उपलब्ध मैदानांची संख्या | |
| ४ | मान्यता प्राप्त पंचांची उपलब्धता | आहे / नाही |
| ५ | सहभागी खेळाच्या चमु करीता निवास व भोजन व्यवस्थेबाबत माहिती | आहे / नाही |

दिनांक : ----------------------------------

स्थळ : ----------------------------------

प्राचार्य स्वाक्षरी (सही शिक्यानिशी)
महाविद्यालयाचे नाव